# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मीरा - भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्याप्रमाणे**

**(१) १०३४३ (०७-०४-२०१५). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा - भाईंदर शहरातील (जि.ठाणे) मीरा - भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्याप्रमाणे शासनाच्या कोणकोणत्या जागा आरक्षणाखाली बाधीत होत आहेत आणि एकूण किती क्षेत्र होत आहे,

(२) असल्यास, आरक्षण बाधीत सरकारी जागा महानगरपालिकेला हस्तांतरण करण्यासंबंधी शासनाकडे निश्चित धोरण आहे काय, आरक्षणाची जागा महापालिकेला ताब्यात देण्यात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) मिरा-भाईंदर शहरातील महाराष्ट्र शासनाच्या एकूण २८ जागा विकास आराखड्याप्रमाणे बाधीत होत आहेत. मौजे चौक, उत्तन, राई, मुर्धे, भाईंदर घोडबंदर, नवघर, खारी येथील शासकिय जमीनी आरक्षणात अंतर्भूत असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे १७१.३३ हे. आर. इतके आहे.

(३) व (४) मंजूर विकास योजने अंतर्गत शासकिय जमीन असल्यास ती महानगरपालिकेस त्या आरक्षित कारणाकरिता महसुल विभागाकडून नियमानुसार हस्तातरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते. एकूण २८ आरक्षणाखालील जागांपैकी ९ आरक्षणाखालील जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत व १८ आरक्षणांखालील जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरीता महानगरपालिकेकडे सोपविल्या आहेत तर १ आरक्षणाखालील जागेचा अद्याप निर्णय झालेला नाही.

**विभागीय जात वैधता दक्षता पथकांकडे आदिवासींचे हजारो प्रमाणपत्रांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२) २२०७५ (३०-०७-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीमधील प्रमाणपत्रांची तपासणी करणा-या विभागीय जात वैधता दक्षता पथकांकडे आदिवासीचे हजारो प्रमाणपत्रांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणे निकाली न लावल्यामुळे शेकडो कर्मचाऱ्यांच्या शासकीय सेवा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्राची झेरॉक्स जोडणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, ठाणे, नंदुरबार या विभागीय दक्षता विभागांकडे किती प्रकरणे प्रलंबित आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२२-११-२०१६) :** (१) व (२) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांअंतर्गत असलेल्या दक्षता पथकांकडे शालेय व गृह चौकशीसाठी १२,३४७ प्रकरणे माहे मे, २०१५ अखरे चौकशीसाठी प्रलंबित होती.

(३) शासन परिपत्रक दि.२५.०७.२०१६ अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना समितीकडे जात पडताळणीकरीता सादर केलेल्या अर्जाची पावती उपलब्ध करुन व हमी पत्राच्या आधारावर प्रवेश अर्ज भरण्याची मुभा देण्यात आली आहे.

(४) राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे, ठाणे, नाशिक, नंदुरबार, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व गडचिरोली या आठ समित्यांअंतर्गत असलेल्या दक्षता पथकांकडे माहे ऑगस्ट, २०१६ अखेर एकूण सुमारे १४,३३० इतकी प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(५) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने नियमित आढावा घेणे, निश्चित प्रमाणपत्र प्रकरणे निकाली काढणे तसेच दक्षता पथकामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील सायखेडा प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे पट्टे अजूनही देण्यात आले नसल्याबाबत**

**(३) २७०५० (१०-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील सायखेडा प्रकल्पांतर्गत सन १९६७-६८ मध्ये वागदा गावातील शेतक-यांची जमीन धरणात गेली असून बाधित शेतक-यांना उमरी व पाचरी या गावात मोफत जमीन देण्यात आली परंतू सदर जमिनीचे पट्टे अजूनही देण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, ह खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनींच्या ७/१२ वर सरकार अशी नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पामधील बाधितांना जमिनीचे पट्टे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विष्णु सवरा (२१-११-२०१६) :** (१) मौजा-वागदा येथील ८ प्रकल्पग्रस्तांना मौजा-उमरी येथील सर्वे क्र. ३३ मधील गट क्र. ८९,९०,९१/१,९१/२, ९२,९३,९४ व १०० या सरकारी जमिनीचे वाटप दिनांक १८/०५/१९६८ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले असून संबंधितांना पट्टे देण्यात आले आहेत व त्यांची नोंद महसुल दप्तरी घेण्यात आली आहे. तर मौजा-पाथरी या गावात सायखेडा प्रकल्पाअंतर्गत जमीनीचे संपादन करण्यात आले नसल्याचे जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी कळविले आहे.
(२) मौजा उमरी येथील गट क्र. ८५ मधील क्षेत्र ३.३७ हे. आर तसेच गट क्र. ९५ मधील क्षेत्र १.९८ हे. आर व क्षेत्र १.९८ हे. आर ही जमीन वहिवाटाखाली असून सदर जमिनीच्या ७/१२ वर सरकार सी क्लास अशी नोंद आहे.
(३) व (४) मौजा-उमरी येथील उक्त जमीन सरकार सी क्लास असल्यामुळे याबाबत वन विभागामार्फत अभिलेखाची पडताळणी करुन प्रचलित धोरणानुसार त्या विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्य सहकारी बँकेच्या संचालकांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४) ३२६६९ (२२-१२-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ७६ माजी संचालकांनी गैरव्यवहार करुन बँकेचे १६०० कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी सहकार कायदा कलम ८५ नुसार तत्कालीन

संचालकांना दोषी ठरवून, घोटाळ्याची आर्थिक जबाबदारी निश्चित केली असतानाही अद्याप शासनाने सदरहू संचालकांची मालमत्ता जप्त करुन त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोषी ७६ संचालकाविरुध्द कारवाई करण्यास शासनास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, तसेच उक्त बँकेकडून सन २००८ ते २०१२ या कालावधीत संचालक मंडळाच्या निर्णयामुळे बँकेचे सुमारे ९०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे चौकशी अधिकरी श्री. शिवाजी पहिनकर यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आणले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) नाही.

(२) प्राधिकृत अधिकारी यांनी दि.१० सप्टेंबर २०१५ रोजी बँकेच्या तत्कालीन ७७ संचालकांविरुध्द बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीबाबतचे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ७२ (३) अन्वये आरोपपत्र ठेवले असून नियम ७२ (४) अन्वये त्याबाबतचे सुनावणी कामकाज पुढे चालू ठेवले आहे. प्रस्तुत प्रकरणी अपचारी संचालकांची संख्या मोठी असल्याने अपचारी संचालकांचे लेखी निवेदन तपासणे, त्याबाबत सुनावणी घेणे इत्यादीमुळे कार्यवाही करण्यास विलंब लागत आहे.

(३) होय.

(४) प्राधिकृत अधिकारी यांना चौकशीचे कामकाज विहित मुदतीत (२२.११.२०१६ पूर्वी) पूर्ण करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर चौकशीचे कामकाज दैनंदिन करण्याबाबतच्या सूचनाही दिलेल्या आहेत.

(५) अपचारी संचालकांचे लेखी निवेदन तपासणे, त्याबाबत सुनावणी घेणे इत्यादीमुळे कार्यवाही करण्यास विलंब लागत आहे.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुकीबाबत**

**(५) ३४४१२ (२२-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुकीच्या प्रस्तावास राज्यस्तरीय कार्यबलाच्या उपसमितीने नामंजूर केल्यामुळे नवीन नियुक्तीची प्रक्रिया सुरु करण्याचे सहकार आयुक्त कार्यालयाने जिल्हा बँक प्रशासनास ,दि २७ मे २०१३ रोजी आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर पदावरील नियुक्तीची प्रक्रिया त्वरीत सुरु करण्यासाठी दि. ५ जून २०१३ रोजी विभागीय सहनिबंधकांनी जिल्हा बँक प्रशासनास आदेश देवूनही बँकेने या आदेशाकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाबार्डच्या निकषानुसार अपात्र असूनही सदर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बेकायदेशीरपणे मुदतवाढ देण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
चौकशीत काय आढळून आले वा तदनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणेसाठी तसेच पात्र अधिकाऱ्यांची नेमणूक प्रक्रिया सुरु करणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६)** :(१) होय.
(२) होय.
(३) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक या बँकेच्या प्रशासक मंडळाने आरबीआय कडील दि.०५/०७/२०११ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांप्रमाणे विहीत केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पदावर योग्य व पात्र व्यक्तीची नियुक्ती करुन तसा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालय, पुणे व नाबार्डला पाठविला.

हा प्रस्ताव नाबार्डने राज्यस्तरीय कार्यबलापुढे ठेवला व राज्यस्तरीय कार्यबलाच्या दि.०२/०२/२०१५ व दि.०९/०९/२०१५ रोजीच्या सभेमध्ये शिफारस केल्यानुसार राज्यस्तरीय कार्यबलाच्या दि.११/०९/२०१५ रोजीच्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर केलेल्या नियुक्तीची राज्यस्तरीय कार्यबलाने नोंद घेतली असून बँकेने त्यांच्या मानव संसाधन विषयक धोरणानुसार तथा कर्मचारी सेवा नियमातील तरतूदीनुसार कार्यवाही ठेवावी असे सहकार आयुक्त व निबंधक पुणे कार्यालयाकडील दि.३०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस कळविण्यात आलेले आहे.
(४) श्री.गोसावी बी.एन. यांनी शासनाकडील दि.१/९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार तसेच विषयांकित प्रकरणी विभागीय सहनिबंधक कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडील दि.१०/११/२००५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अधिकारी यांच्या पथकाची नियुक्ती करण्यात आलेली होती.

चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये असे अभिप्राय दिले आहेत की राज्यस्तरीय कार्यबलाच्या दि.११/०९/२०१५ रोजीच्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार बँकेने मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर केलेल्या नियुक्तीची राज्यस्तरीय कार्यबलाने नोंद घेतली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत

**(६) ३४४३५ (२२-१२-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या विद्यमान संचालक मंडळाने राजकीय सूड बुद्धीने करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने रिजर्व बँक ऑफ इंडिया व नाबार्ड बँकेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या ज्या शासकीय नियम व अटीप्रमाणे होतात तश्याच प्रकारे सर्व जिल्हा सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचा निर्णय शासन घेणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदरच्या बदल्या राजकीय सूड बुद्धीने न होता जिल्हा बँकेवर शासन नियमावली आणून कर्मचाऱ्यांना सुरक्षितता देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही. सहकारी बँकेचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती व बदली इ.बाबतचे सर्व अधिकार बँकेचे संचालक मंडळ व प्रशासन यांना आहेत. याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्डने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार सहकारी बँकेमार्फत कार्यवाही केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी असल्याची प्रमाणपत्रे बनावट असलेबाबत

**(७) ३४८१७ (२३-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या ४३७ उमेदवारांपैकी २५ उमेदवारांनी आदिवासी असल्याची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी नसतानांही उमेदवारांना आदिवासी प्रमाणपत्रे देणा-या अधिका-यांविरुध्द व बनावट प्रमाणपत्रे सादर करणा-या उमेदववारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, निवड रद्द झालेल्या उमेदवारांच्या जागांवर अन्य उमेदवारांची निवड करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे

२५ उमेदवारांची आदिवासी असल्याची प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले.

(२) प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आल्यानंतर उमेदवारांना प्रशिक्षणास नियुक्ती देण्याबाबतच्या पत्रास स्थगिती दिली. यांच्या विरोधात श्री. कांबळे व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरगाबाद येथे दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान अंतिम आदेश पारित करताना या उमेदवारांना अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देण्यात यावेत असे निर्देश दिले. यास अनुसरुन या उमेदवारांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद व नाशिक यांच्या पुन:चौकशीच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात आली आहे. उमेदवारांच्या जात प्रमाणपत्राच्या पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) लागू नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण, गुहागर व खेड तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(८) ४०१८२ (०५-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे कौढर-चिवेली-लोणारी बंदर रस्ता, मौजे बामणोली-पाभरे रस्ता (ता. चिपळूण), मौजे कोंडकारूळ बंदर रस्ता, मौजे तळी-आबलोली मुख्य रस्ता ते काळसूर कौढर रस्ता, मौजे चिखली-कारूळ-विसापूर रस्ता, मौजे रानवी-धोपावे रस्ता, मौजे पेवे-खामषेत मादाली नदी रस्ता (सर्व ता. गुहागर) तसेच मौजे आवाषी-गुणदे रस्ता, मौजे संगलट-कोरेगाव-षेरवल गावातील कोरेगाव गावातील रस्ता, मौजे कोतवली-मांडवकरवाडी रस्ता व मौजे धामणंद-पोसरे-चोरवणे मार्गावरील पोसरे नारदपूल भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे संबंधित ठिकाणच्या रहिवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे. प्रश्नांकित रस्त्यापैकी मौजे बामणोली-पाभरे रस्ता (ता.चिपळूण), मौजे चिखली-कारुळ-विसापूर रस्ता, मौजे संगलट-कोरेगाव-षेरवल गावातील कोरेगाव गावातील रस्ता, मौजे धामणंद-पोसरे-चोरवणे मार्गावरील पोसरे नारदपूल भागातील रस्ता हे प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचे रस्ते असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहेत.

सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पृष्ठभागावरील खड्डे भरुन सदरहू रस्ते वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.

(३) होय.

(४) व (५) प्रश्नांकित चिपळून तालुक्यातील मजरे कौंढर चिवेली या इतर जिल्हा मार्ग रस्त्यावर सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु.२८.५० लक्षचे तसेच खेड तालुक्यातील आवाशी गुणदे या ग्रामीण मार्ग रस्त्यावर सन २०१५-१६ मध्ये रस्ते विशेष दुरुस्ती अंतर्गत रु.१०.०० लक्षचे काम मंजूर आहे.

या विभागाकडील प्रश्नांकित ७ रस्त्यांचया उर्वरित खराब लांबीतील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.६८१.३५ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

लोकप्रतिनिधी यांनी विविध योजनांमध्ये सदरची कामे सूचविल्यास व त्यास मंजूरी मिळाल्यास सदरची कामे हाती घेणे जिल्हा परिषदेला शक्य होईल.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील चार प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यावर डांबरीकरणाची एकूण सुमारे रु.५५० लक्ष किमतीची कामे मंजूर आहेत.

---

## नाशिक जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनांना कर्जमाफी मिळण्याबाबत

**(९) ४५५३४ (३०-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे माहे ऑक्टोबर, २००९ साली झालेल्या मंत्रिमंडळाच्या कर्ममाफी संदर्भातील बैठकीत तापी खोऱ्यांतील जळगाव जिल्ह्यातील २१ व धुळे जिल्ह्यातील ३५ उपसा सिंचन सहकारी संस्थांना कर्जमाफी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी मागणी करुन देखील त्याच धर्तीवर नाशिक जिल्ह्यातील ८ उपसा सिंचन योजनांना कर्ममाफी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनांना कर्जमाफी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-११-२०१६) :**

(१) अंशतः खरे आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएसएल-१५०९/प्र.क्र.५५९/७-स, दिनांक २६.०८.२००९ अन्वये जळगाव जिल्ह्यातील २१, धुळे जिल्ह्यातील २४ व नंदूरबार जिल्ह्यातील १९ अशा एकूण ६४ उपसा जलसिंचन संस्थांना कर्जमाफी देण्यात आली.

(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएसएल-१५०९/प्र.क्र.५५९/७-स, दिनांक २६.०८.२००९ अन्वये महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना सन २००९ मध्ये लागू करण्यात येऊन सन २०१० मध्ये संपुष्टात आली. उपरोक्त शासन निर्णय दिनांक २६.८.२००९ मध्ये नाशिक जिल्ह्याचा समावेश नाही.

सदर योजनेसाठी नाशिक विभागामध्ये धुळे, नंदूरबार, जळगाव या जिल्ह्यातील संस्थाचे प्रस्ताव प्राप्त झाल्याने त्यांचा समावेश करण्यात आला, नाशिक जिल्ह्यातील ८ उपसा जलहसंचन संस्थांचे कर्जमाफी मिळण्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव अथवा पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आली नाही. सदर योजना संपुष्टात आल्याने सन २०१० नंतर कोणतीही मागणी अद्यापपावेतो विचारात घेण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील लवासा सिटी प्रकल्प साकारत असताना**
**पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत**

**(१०) ४६४५१ (२०-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लवासा सिटी प्रकल्प साकारत असतांना मोठ्याप्रमाणात पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे जाने २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास लवासा प्रकल्पास इको फ्रेन्डली प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे काय असल्यास, इको फ्रेन्डली प्रकल्प अंतर्गत सदर ठिकाणी कोणती कामे करण्यात आली आहेत,

(३) असल्यास वृक्ष तोडीची परवानगी देताना कोणते नियम व अटी घालण्यात आल्या होत्या व एकूण किती वृक्ष तोडण्याची परवनागी देण्यात आली आहे,

(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०१-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. लवासा प्रकल्पास इको फ्रेन्डली म्हणून मान्यता देण्यात आलेली नाही.

(३) लवासा सिटी प्रकल्पाला झाडे तोडण्याबाबत महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ चे तरतुदी व अटीप्रमाणे एकूण ६९ झाडे तोडण्यास वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल सिंहगड यांनी दिनांक १६.०१.२०१६ रोजी परवानगी दिलेली आहे.

(४) व (५) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ प्रमाणे झाडे तोडण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यक ती तपासणी करण्यात आली असून वृक्षतोडीस दिलेल्या परवानगी प्रमाणे ६९ झाडांची तोड करण्यात आल्याचे आढळून आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक विकास प्रकल्पातंर्गत असलेल्या शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळेत मळणीयंत्र पडून असल्याबाबत**

**(११) ४७७८० (२९-०४-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक विकास प्रकल्पातंर्गत असलेल्या शासकीय पोस्ट बेसिक आश्रम शाळेत लाखो रुपयाचे मळणीयंत्र गेल्या १० वर्षापासून धुळखात पडुन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांना सन २००५ मध्ये नाशिक आयुक्त कार्यालया मार्फत २४ मळणी यंत्राचे वाटप करण्यात आले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मळणी यंत्र तत्कालीन अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे गोर-गरीब आदिवासी व गरजु लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित ठेण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्प कार्यालया मार्फत हिवरी येथील आश्रमशाळेत १० मळणी यंत्र व १४ मळणी यंत्र कळंब तालुक्यातील अंतरगांव व पुसद तालुक्यातील हर्षी येथील शाळेत पाठविण्यात आले असता सदर यंत्र गोरगरीबांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने लाखो रूपये खर्चून मळणी यंत्र खरेदी केले, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, मळणी यंत्र वाटप करण्यासाठी प्रकल्प अधिका-यांनी अशी कोणती अट लाभार्थ्यांसाठी ठेवली होती की ज्या अटीची पुर्तता कोणीही करू शकला नसल्यामुळे गोरगरीब, आदिवासी, गरजु लाभार्थी या योजनेपासुन वंचित राहिले, हेही खरे आहे काय,
(६) असल्यास, लाभार्थ्यांनी मळणी यंत्र मिळण्याकरीता कागदपत्रांची पुर्तता करून आवेदन केले असता अनेक दिवस पाटपुरावा करूनही देखील लाभार्थ्यांना मळणी यंत्राचा लाभ देण्यात आलेला नाही, हेही खरे आहे काय,
(७) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) अंशतः खरे आहे.

तथापि, हिवरी येथील आश्रमशाळेत १२ मळणीयंत्रे, हर्षी येथील आश्रमशाळेत १९ मळणी यंत्रे व आंतरगांव येथील आश्रमशाळेत १७ मळणी यंत्रे अशा एकूण ४८ मळणीयंत्रांचे वाटप करण्यात आले आहे.

(५) बीपीएल ची अट ठेवली होती. परंतु लाभार्थ्यांशी वारंवार पत्रव्यवहार करुनही तसेच मळणीयंत्राला इलेक्ट्रीक मोटार व चाकजोडी नसल्याने लाभार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला नाही.

(६) हे खरे नाही.

(७) तत्कालीन प्रकल्प अधिकारी व संबंधित कर्मचा-यांवर FIR No. ९५/४१११०९, दिनांक ०४.०८.२००९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

**गोंडगाव,ता.भडगाव,जि.जळगाव येथील सावदे गावालगत असलेल्या के.टी.वेअर ची दुरुस्ती करणे बाबत**

**(१२) ४८४५८ (२९-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) येथील सावदे गावालगत असलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याला मोठे भगदाड पडले असून पाण्याची मोठी गळती होत असल्याचे माहे डिंसेबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तेथील नागरिकांनी वारंवार तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावदे के.टी.वेअरची दुरुस्ती व उंची वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१२-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे, किरकोळ स्वरुपाची गळती असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) जिल्हा परिषद, जळगाव अंतर्गत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभगाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) सदरचा बंधारा कजगांव व ३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या पाणी साठवण्यासाठी बांधलेला आहे. सदरची योजना मजीप्रा मार्फत दि.१.२.२००४ पासून सुरु करण्यात आली असून सदरची योजना ग्रामपंचायत कजगांवकडे दि.१९.७.२०११ रोजी पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे योजनेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत वीज बिल व इतर दुरुस्ती ग्रामपंचायती मार्फत करण्यात येत असल्याने त्यामुळे बंधाऱ्याची सदरची दुरुस्ती ग्रामपंचायती मार्फत करणे क्रम प्राप्त आहे.

मौजे सावदा ता.भडगांव जि.जळगांव येथील गिरणा नदीवरील साठवण बंधाऱ्याची उंची वाढविणे बाबतचे संकल्पन, अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन मिळणे बाबत विनंती करण्यात आली होती. सदर बाबत अधिक्षक अभियंता (दगडी धरण) मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना दिंडोरी, नाशिक यांचे कार्यालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. विभाग जळगांव यांनी केली असून अधिक्षक अभियंता (द.ध ) मध्यवर्ती संघटना नाशिक यांनी मौजे सावदा ता. भडगांव येथील गिरणा नदीवरील साठवण बंधाऱ्यांची उंची वाढविणे कामी सल्ला मसलत कामासाठी लागणारे शुल्क रु.६,१०,२२७/- ची मजीप्रा विभागाकडे मागणी करण्यात आली आहे मात्र सदर कामी मजीप्रा विभागाकडे कोणतीही तरतुद नसल्याने आवश्यक निधी प्राप्त होणे करिता जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सहकारी संस्थांमध्ये ठराविक रक्कम भरल्यानंतर शेअर्स रक्कम घेता येत नसल्याबाबत**

**(१३) ५२४०३ (२७-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी सेवा संस्थांमध्ये ठराविक रक्कम भरल्यानंतर शेअर्स रक्कम घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील सहकार सेवा संस्थामध्ये सभासद शेअर्स रक्कम म्हणून बेकायदेशीररित्या प्रत्येक वर्षी पीक कर्जातून पाच टक्के रक्कम कापून घेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) नाही. प्रत्येक वर्षी पीक कर्जातून ५ % इतकी रक्कम सभासदांचे कर्जातून शेअर्सपोटी कपात केली जात नाही, तर त्याची कमाल भागधारणा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २८ (ब) व संस्था उपविधी तरतुदीप्रमाणे रक्कम कपात केली जाते. संबंधित सभासदाची कमाल भागधारणा रु.२००००/- पर्यंत झाल्यानंतर अशी कपात करण्यात येत नाही. तथापि सभासदांचया मान्यतेने त्यांचे कर्जाऊ रक्कमेतील ५% इतकी रक्कम ठेव म्हणून संस्थेत जमा करयात येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांची थकित देणी देण्याबाबत

**(१४) ५३५३० (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूविकास बँक अवसायनात काढण्याची प्रक्रिया सुरु असून त्यासाठी अवसायकाची नियुक्ती देखील केली असून, त्यासाठी नियुक्त केलेल्या उपसमितीने कर्मचाऱ्यांना ओटीएस (एकवेळ समझोता योजना) देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते, तथापि प्रत्यक्षात बँकांच्या अवसायनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, कर्मचाऱ्यांना ३५ महिन्याचे थकित वेतन आणि ओटीएस याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूविकास बँकेच्या २९ जिल्हा बँका त्यांच्या ३४६ उपशाखा व त्यामध्ये काम करणारे १०४७ कर्मचारी, यातील काही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असल्याने सेवानिवृत्तीची आणि थकित वेतनाची रक्कम न मिळाल्याने कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा करावयाचा तसेच कौटुंबिक प्रश्न कसे सोडवावयाचे याबाबतचा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार बँकेतील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-११-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. एलडीबी-१०१३/प्र.क्र.६९९/७-स, दिनांक २४.०७.२०१५ अन्वये भुविकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शिखर भुविकास बँक व जिल्हा भुविकास बँका अवसायनात घेण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत १४ जिल्हा भुविकास बँका अंतीम अवसायानात असून सातारा भुविकास बँकेच्या अवसायनास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

शिखर भुविकास बँक व उर्वरित १५ जिल्हा भुविकास बँकांच्या अवसायनाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने अवसायनाचे अंतीम आदेश पारीत करुन नयेत असे आदेश दिले असल्याने या बँका अंतरीम अवसायनात आहेत.

शिखर भुविकास बँक व जिल्हा भुविकास बँकांच्या कर्जदार सभासदांकडील थकीत कर्जवसुलीसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेस दिनांक ४.७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.३.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

भुविकास बँकाच्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे थकीत वेतन या बँकांच्या कर्जदार सभासदांकडील कर्जवसुली व शिखर बँकेकडे उपलब्ध असलेली अतिरिक्त निधीतून तसेच बँकाच्या स्थावर मालमत्ता शासनाकडे हस्तांतरण अथवा विक्रीतून अदा करावयाचे आहे.

त्यानुषंगाने विक्री करावयाच्या मालमत्तांबाबत बाजारभावाप्रमाणे ई-टेंडरव्दारे निविदा मागविण्याबाबत सहकार आयुक्त यांना दिनांक २६.९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील २६० सहकारी संस्थावर करण्यात आलेली कारवाई**

**(१५) ५३५३६ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आयुक्तालयाच्या, आदेशान्वये ठाणे जिल्ह्यातील उपनिबंधक डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या परिक्षेत्रातील सहकारी संस्थाच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणात २६० संस्था बंद असल्याची माहिती मिळाल्याने सदर संस्थांची नोंदणी रद्द करण्याची कारवाई माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केलेल्या सर्वेक्षणात कोणकोणत्या बाबी निदर्शनास आल्या, संस्था नोंदणी करताना सादर करण्यात आलेले पुरावे उपनिबंधकाचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी जागेवर जावून तपासणी करण्यात आले होते काय,

(३) असल्यास, संस्थेची नोंदणी करताना उपनिबंधकाच्या कार्यालयाने सर्व बाबी दुर्लक्षित करुन संस्थेची नोंदणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (२१-११-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

---

**सहकारी बँकांच्या संचालकांना निवडणुक लढवण्यास शासनाने घातलेली बंदी**

**(१६) ५३५३८ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील सहकारी बँकांच्या संचालकाना निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याचा निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजीवा त्या सुमारास झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिझर्व्ह बँकेने राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले, तथापि या बरखास्त संचालकांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भातील चौकशी पूर्ण झाली नाही, त्यांचे दोषसिध्द झाले नाही, राष्ट्रीय स्तरावरील सहकारी कायदा, सहकारी अर्थकारण याबाबत यासंदर्भात केंद्र शासनाने तसेच रिझर्व्ह बँक यांच्यास्तरावर फेरविचार झाला असून, त्यानुसार महाराष्ट्र शासनानेही आपला कायदा बदलला असून, बदलेल्या कायद्याच्या तरतूदी लक्षात घेता भ्रष्टाचाराचा आरोप सिध्द होत नाही, तोपर्यंत एखाद्या संचालकाला पुन: निवडणुकीसाठी अपात्र ठरवता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचा हा निर्णय बेकायदेशीर आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, व त्यानुसार याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची करणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-११-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना पीककर्ज देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(१७) ५३७७० (२०-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना पीककर्ज देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोरा (ता.उरण, जि.रायगड) बंदरावर अनेक सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१८) ५४०९२ (२३-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरा (ता.उरण, जि.रायगड) बंदरावर अनेक सुविधांचा अभाव असून घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छतागृहातील दुर्गंधी, इतरत्र पडलेला कचरा व बंद अवस्थेत असलेले पथदिवे यामुळे प्रवाशांना त्रास होत असल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांनी वारंवार तक्रारी करूनही महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१६) :** (१), (२) व (३) मोरा बंदर येथील प्रवाशी जेट्टीवरील पथदिवे दुरुस्त करण्यात आले असून ते आजमितीस सुस्थितीत आहेत. त्याचप्रमाणे मोरा बंदर येथील प्रवाशी जेट्टी ठिकठिकाणी नादुरुस्त झाल्याने सदर जेट्टीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने स्ट्रक्चरल कंसल्टंटची नेमणूक केली व त्यांच्यामार्फत मोरा बंदर येथील प्रवाशी जेट्टीचे स्ट्रक्चरल ऑडीटचे काम पूर्ण करण्यात आले असून सदर दुरुस्तीच्या कामाचा समावेश महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थविषयक 'प्रॉब्लेम ऑफ रूपी इट्स ओरिजिन ॲण्ड इट्स सोल्युशन' या इंग्रजी ग्रंथाचा 'रूपयाचा प्रश्न उद्गम आणि उपाय' हा मराठी अनुवादाबाबत**

**(१९) ५४४१४ (२२-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती राज्यासह देशभर साजरी होत असताना त्यांच्या अर्थविषयक 'प्रॉब्लेम ऑफ रूपी इट्स ओरिजिन ॲण्ड इट्स सोल्युशन' या इंग्रजी ग्रंथाचा 'रूपयाचा प्रश्न उद्गम आणि उपाय' हा मराठी अनुवाद गेल्या २० वर्षापासून सरकार दरबारी धूळ खात पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू इंग्रजी ग्रंथ मराठी भाषिकांपर्यंत पोहोचावा याकरिता या ग्रंथाच्या मराठी अनुवादाचे काम शासनाने वर्धा येथील ग्रामीण सेवा महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. विजय कवीमंडन यांच्याकडे १९९४ मध्ये सोपविल्यानंतर त्यांनी सुमारे ७०० पानांचा अनुवाद करून २ वर्षात शासनास सादर केला, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुवादाच्या दर्जाबाबत तज्ञांचा समाधानकारक अहवाल दिनांक १ सप्टेंबर १९९६ रोजी डॉ.|बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समितीला सादर करण्यात आला असून, सदरहू समितीने तो प्रकाशनासाठी स्वीकारून दि|.२५ मार्च १९९७ रोजी डॉ. कवीमंडन यांना मानधन ही मंजूर केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू समितीच्या दि|.२२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत या अनुदानाच्या अंतिम छपाईला मान्यता देण्यात आलेली असतानाही अद्यापी हा अनुवाद मराठी वाचकांसमोर आलेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या सदरहू अर्थविषयक ग्रंथाचा मराठी अनुवाद लवकरात लवकर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) दुसऱ्या अनुवादकाचा शोध घेऊन अनुवादाचे काम करुन घेण्यासाठी प्रयत्न चालू आहे.

(६) समितीने अनुवाद अमान्य केला आहे.

---

### अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उमटे धरणाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) ५४९८४ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उमटे धरणामधील गेली ३८ वर्षामध्ये गाळ काढण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमटे धरणामध्ये जलशुध्दीकरणाचे यंत्र नसल्यामुळे धरणातील पाणी अशुध्द झाले आहे तसेच धरणाच्या पाणी अडविणाऱ्या भिंतीला तडे गेले असल्यामुळे पाण्याची गळती होत आहे त्यामुळे परिसरातील ६२ गावे व वाड्यांना पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमटे धरणाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

उमटे धरणाचे खालील बाजूस बांधणेत आलेल्या साठवण टाकीमध्ये पाणी शुध्दीकरणासाठी योग्य प्रमाणात टी.सी.एल. पावडरचा वापर करण्यात येतो.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वाढीव उमटे पाणी पुरवठा योजनेमध्ये नव्याने जलशुध्दीकरण संयंत्र बसविण्याचे प्रस्तावित आहे.
(३) आवश्यकता दिसून आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने, 'मेक इन महाराष्ट्राच्या, धोरणांतर्गत उद्योग विकासाला चालना देण्यासाठी, बंद कारखान्यांच्या विक्रीच्या नव्या धोरणात बदल करणेबाबत

**(२१) ५५०३७ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेक इन महाराष्ट्र मध्ये राज्यात उद्योग विकासाला चालना मिळण्यासाठी राज्यातील बंद कारखाने, गिरण्या व कंपन्यांच्या जमीन विक्रीचे नवे धोरण शासनाने अंमलात आणण्याचा निर्णय दिनांक १८मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणात कारखान्यांच्या वा कंपनीच्या मालकांनी जमीन विक्री वा हस्तांतरणातून येणाऱ्या पैश्यातून ३०० रुपयाच्या स्टँम्प पेपरवर हमीपत्र देण्याचे मालकांवर बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हमीपत्रानुसार मालकांनी कामगारांची देणी न दिल्यास सदर धोरणात मालकांवर कोणती कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली, या धोरणाचे एकूण स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, राज्य शासनाने बंद कारखाने विक्रीच्या धोरणाची अट शिथिल करुन कोणते बदल केले आहेत त्याचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, राज्य शासनाने कामगारांची देणी चुकती करण्याची अट शिथिल करतांना कामगारांच्या हक्काचे संरक्षण कायम ठेवणेबाबत कोणत्या तरतूदी केल्या आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-११-२०१६)** :(१) राज्यात उद्योग विकासाला चालना मिळावी म्हणून राज्यातील बंद आस्थापना/कारखाने/गिरण्या व कंपन्यांच्या जमिनीचे विकास/विक्री/हस्तांतरण करण्यासाठी कामगार आयुक्त यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेत सहजता व सुलभता आणण्याकरिता शासनाने दिनांक १८/०५/२०१६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कारण बंद आस्थापना/कारखाने कंपन्या/गिरण्या यांच्या जमिनीचे विकास/विक्री/हस्तांतरण करताना नविन उद्योजकाने व जुन्या मालकाने /उद्योजकाने (उपलब्ध असल्यास) संबंधित जमिनीच्या हस्तांतरणापूर्वी रु.३००/- च्या स्टॅम्पपेपरवर कामगारांची कायदेशीर देणी उद्भवल्यास ती अदा करण्याबाबतचे हमीपत्र देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.
(३) कामगारांची कायदेशीर देणी न दिल्याने संबंधित आस्थापना / कारखाने /गिरणी/कंपनी यांच्या भूखंडाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया रद्द करण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशांनुसार करण्यात येईल.
(४) दिनांक १८/०५/२०१६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाबाहेरील सात वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता बंद असलेल्या आस्थापना/कारखाने/गिरणी/कंपनी यांच्या भूखंडाचे नविन उद्योजकास केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरिता हस्तांतरण करण्यात येणार असल्यास शासन निर्णय क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/कामगार-२, दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/०१/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहणार नाहीत. तथापि ७ वर्षापेक्षा कमी कालावधी करिता बंद असलेल्या तसेच उद्योग सुरु करण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरिता आस्थापना/कारखाने/गिरणी/कंपनी यांचे भूखंड वापरले जात असल्यास त्यांना दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/०१/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील.

तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील आस्थापना/कारखाने/गिरणी/कंपनी यांचे भूखंड उद्योगाच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी वापरले जाणार असल्यासच त्यास दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/०१/२००९ या दोन्ही शासन निर्णयाच्या तरतुदी लागू राहतील अन्यथा एम.आय.डी.सी. मधील आस्थापना/कंपन्या/कारखाने/गिरणी यांचे भूखंड केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरिता हस्तांतरण करण्यात येणार असल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/०१/२००९ च्या तरतूदी लागू राहणार नाहीत.

(५) बंद आस्थापना/कारखाने/कंपन्या/गिरण्या यांच्या जमिनीचे विकास/विक्री/हस्तांतरण करताना नविन उद्योजकाने व जुन्या मालकाने/उद्योजकाने (उपलब्ध असल्यास) संबंधित जमिनीच्या हस्तांतरणापूर्वी रु.३००/- च्या स्टॅम्पपेपरवर कामगारांची कायदेशीर देणी उद्भवल्यास ती अदा करण्याबाबतचे हमीपत्र देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच कामगारांची कायदेशीर देणी अदा न केलयास संबंधित आस्थापना/कारखाने/गिरणी/कंपनी यांच्या भूखंडाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया रद्द करण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशांनुसार करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक गावात शेतक-यांना बँकांकडून पिक कर्ज देण्यात दूर्लक्ष होत असल्याबाबत**

**(२२) ५५२२५ (२२-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकरी मागील २ वर्षापासून दुष्काळाच्या छायेत असताना तालुक्यातील बँका शासनाकडून जाहिर करण्यात आलेले पीक कर्ज, पुनर्गठन, सुक्ष्मसिंचन यासारखे कर्ज वाटप करण्यात दूर्लक्ष करीत असल्याची तक्रार छावा संघटनेने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली असल्याचे दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित विभागीय अधिकारी यांनी लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशाराही दावा संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांची वारंवार दिशाभूल करीत असल्याने प्रकरणी मरवाळी येथील एका शेतक-यांने आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कर्ज वाटप न करणा-या संबंधित बँक व्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारी यांचेवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) मौजे मरवाळी, ता.नायगांव (खै), जि.नांदेड येथील श्री.आनंदा मारोती बस्वदे या शेतक-याने फाशी घेऊन आत्महत्या केलेली आहे. सदर शेतक-यास दि.१७ फेब्रुवारी, २०१६ रोजी सेवा सहकारी संस्था म., मरवाळी, ता.नायगांव (खैरगाव) जि.नांदेड या संस्थेचे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा रातोळी, ता.नायगांव (खैरगांव), जि.नांदेड या शाखेमार्फत किसान क्रेडीट कार्ड या योजनेखाली रु.४००००/- इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

(४) धर्माबाद तालुक्यामध्ये ५ राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा व २ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखेमार्फत एकूण ६८९२ शेतक-यांना रु.३५.३८ कोटींचे पीक कर्ज खरीप २०१६ मध्ये वाटले आहे. धर्माबाद तालुक्यातील एकाही शेतक-यानं बँकेकडून कर्ज वाटपास दुर्लक्ष होत असल्याबाबत व कर्ज वाटप होत नसल्याबाबत तक्रार केलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील लाखो युवकांनी रोजगाराच्या शोधात पुणे, बेंगळुरु, मुंबईत स्थलांतर केले असल्याबाबत**

**(२३) ५५५२२ (२२-०८-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात सन १९९९-२०१५ या काळात तब्बल सव्वा आठ लाख युवकांनी रोजगाराच्या शोधात पुणे, बेंगळुरु, मुंबईत स्थलांतर केले असल्याचे एका अभ्यास संघटनेच्या अहवालातून माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात रोजगार देणारे उद्योग नसल्याने मोठ्या प्रमाणात युवक स्थलांतर करीत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भात युवकांचे स्थलांतर थांबविण्यासाठी उद्योग स्थापित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-११-२०१६) :** (१) या बाबतची कोणतीही माहिती या विभागाकडे नाही, अथवा कोणताही अहवाल प्राप्त झालेला दिसून येत नाही.
(२) व (३) शासनाद्वारे विदर्भातील नागपूर व अमरावती विभागात उद्योग स्थापन होवून रोजगार निर्मिती व्हावी व राज्यातील प्रादेशिक विकासाचे समतोल राहण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेव्दारे या भागात उद्योग स्थापन होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

शासनाने जून २००५ मध्ये विशाल प्रकल्प धोरण जाहीर केले आहे. सदरचे धोरण सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ व २०१३ मध्ये कायम ठेवण्यात आले आहे. सन २००५ पासून आतापर्यंत (दिनांक १८/०७/२०१६) पर्यंत मंजूर करण्यात आलेल्या विशाल प्रकल्पांपैकी १२३ प्रकल्प विदर्भात स्थापन होणार असून त्यामधील आश्वासित गुंतवणूक सुमारे रू.८१,७४४ कोटी व ७५,४१७ इतका रोजगार अपेक्षित आहे.

दिनांक ११ ते १४ फेब्रुवारी २०१६ दरम्यान “मेक इन इंडिया” सप्ताह मुंबई येथे केंद्रिय वाणिज्य व व्यापर मंत्रालयाच्या सयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. प्रस्तुत मेक इन इंडिया सप्ताहात एकूण २५९४ सामंजस्य करार करण्यात आले होते व एकूण ८ लक्ष कोटी गुंतवणुक व सुमारे ३० लक्ष रोजगार अपेक्षीत आहे. प्रस्तुत सामंजस्य करारापैकी औद्योगिक क्षेत्रात एकूण २४२७ करार झाले व त्याव्दारे रू.३.९४ लाख कोटी एवढी गुंतवणूक अपेक्षीत होती. प्रस्तुत औद्योगिक क्षेत्रातील विशाल प्रकल्प वगळता लघु, मध्यम व मोठे प्रकल्पात एकूण २१९२ सामंजस्य करार राज्यात झाले होते व विदर्भातील नागपूर व अमरावती विभागात ३७३ सामंजस्य करार व त्यातून रू. १६९२.३४ कोटी गुतंवणूक व १५,४२४ रोजगार प्रस्तावित आहेत. त्यापैकी १९५ एवढे उद्योगांकडे स्वत:ची जागा असून त्यांनी प्रत्यक्ष गुतंवणूकीस सुरुवात केली आहे ज्यांना जागेची
आवश्यकता आहे, त्यांचे प्रस्ताव प्राथ्यम्याने निकाली काढणेबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व्दारे प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेने सहकारी संस्थाच्या (ता.तिवसा, जि.अमरावती) सभासदांना कर्ज मंजूर करण्यास नकार दिल्याबाबत**

**(२४) ५५९८८ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावतील जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील खतरगाव सेवा सहकारी संस्था, वरुडा सहकारी संस्था व शेंदुरजाना बाजार सेवा सह संस्था या संस्थेतील कर्जदार सभासदांनी त्यांचेकडील मागील नियमित कर्जाचा भरणा करुनही सन २०१६-१७ च्या खरीप हंगामासाठी या संस्थेतील ७ ते ८ सभासदांना कर्ज मंजूर करण्यास अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेने नकार दिल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक १४ मे, २०१६ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती कार्यालयाने दि.२३.५.२०१६ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्था अमरावती यांना संबधित संस्थांना कर्जवाटप करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सेवा सहकारी संस्था, सातरगाव, वरुडा, शेंदुरजना बाजार या तीनही संस्थांच्या पात्र तीन सभासदांना

दि.१०.६.२०१६ रोजी पिक कर्ज मंजूर केले आहे. सदर सभासदांनी एकूण रु.१८६७००/- रक्कम बँकेतून उचल केलेली आहे. तसेच उर्वरित ३ पात्र सभासदांना पिक कर्ज वाटप करण्यास दि.८.७.२०१६ रोजी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर सभासदांना एकूण रु.११९९१०/- इतके कर्ज वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील हाजी अली दर्ग्यात महिलांना प्रवेश देण्याबाबत**

**(२५) ५६०१८ (२४-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील हाजी अली दर्ग्यात सन २०११ पर्यंत महिलांना प्रवेश होता मात्र त्यानंतर तो नाकारण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हाजी अली दर्ग्यात मुस्लिम महिलांनाही प्रवेश द्यावा यासाठी “हाजी अली सबके लिए” या फोरमतर्फे मागणी करण्यात आली असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, हाजी अली दर्ग्यात महिलांना प्रवेश देण्याबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन महिलांना प्रवेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६) :**(१) श्री. अब्दुल सत्तार मर्चट, विश्वस्त, हाजी अली दर्गा, मुंबई यांच्या जबाबानुसार हे खरे नाही.
परंतू जनहित याचिका क्र. १०६/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशात नोंदविलेल्या निष्कर्षानुसार हाजी अली दर्ग्यात सन २०११ पर्यत महिलांना प्रवेश होता मात्र त्यानंतर तो नाकारण्यात आला, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
हाजी अली दर्ग्यात मुस्लिम महिलांनाही प्रवेश द्यावा यासाठी “हाजी अली सबके लिए” या फोरमतर्फे कोणतेही औपचारिक पत्र किंवा सूचना पत्र विश्वस्त, हाजी अली दर्गा यांना प्राप्त झालेले नाही.
(३) हाजी अली दर्ग्यात महिलांना प्रवेश देण्याबाबत जनहित याचिका क्र. १०६/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २६.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशान्वये हाजी अली दर्ग्यात प्रवेश करण्याबाबत महिलांना पुरुषांप्रमाणेच मुभा देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"राज्यातील १० हजार३४३ विद्यार्थ्यांना ४ थी आणि ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेची शिष्यवृत्ती चार वर्षांपासून मिळत नसल्याबाबत.**

**(२६) ५६३६९ (२२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० हजार ३४३ विद्यार्थ्यांना ४ थी आणि ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेची शिष्यवृत्ती गत चार वर्षापासून मिळत नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील १ हजार ५० विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या रकमेपासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांचे बँक खाते क्र. पासबुकवरील माहिती आणि ऑनलाईन भरलेली माहिती चुकीची आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-१२-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) हे अंशत: खेर आहे.

शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना त्वरीत शिष्यवृत्ती मिळण्याकरिता विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती उपलब्ध करण्यासाठी शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी तसेच गटशिक्षणाधिकारी यांची बैठक घेऊन त्यांना कृती आराखडा देण्यात आला आहे.

शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यास होणाऱ्या सर्व अडचणी लक्षात घेऊन सन २०१२-१३ ते २०१५-१६ मधील विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअर (www.eduonlinescholarship.com) हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर संकेतस्थळावर अचूक माहिती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. तसेच बँक खात्याची चुकीची माहिती दुरुस्त करण्यासाठी दि. १६/४/२०१६ पासून संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार शिष्यवृत्तीची रक्कम वर्ग करण्यात येत आहे.

---

**खोपोली (जि.रायगड) येथील झेनिथ कंपनीच्या कामगारांनी आपल्या मागण्यासाठी मुंबई बिर्ला हाऊसवर मोर्चा काढल्याबाबत**

**(२७) ५६३९९ (२२-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथील पोलाद उत्पादन करणारी तसेच फायद्यात असणारी झेनिथ स्टील कंपनी गेली तीन वर्षे व्यवस्थापकाच्या चूकाच्या धोरणामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने झेनिथ कामगार वसाहतीतील वीज पुरवठा बंद करुन त्यांना वसाहतीतून बाहेर काढून त्या जागेत मोठे गृहसंकुल उभे करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीन वर्षे कंपनी बंद असूनही कामगारांना त्यांची देणी अद्याप देण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कामगार व त्यांच्या कुटुंबियांनी माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील कंपनीच्या बिर्ला हाऊसवर मोर्चा काढून आपल्या मागण्याचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कामगारांचे देणे देण्याबाबत शासनाने तसेच कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-१२-२०१६)** :(१) मे.झेनिथ स्टील कंपनीने दिनांक २७/११/२०१३ रोजीच्या टाळेबंदी सुचनेनुसार उत्पादन स्थगित करुन दिनांक १२/१२/२०१३ पासून टाळेबंदी लागू केली आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, व्यवस्थापन व कामगार यांचेकडे केलेल्या चौकशी अंती अशा प्रकारे कुठलाही प्रयत्न झालेला नाही असे समजले. तथापि, फेब्रुवारी, २०१६ ते मार्च, २०१६ दरम्यान विद्युत देयके अदा न केल्यामुळे विद्युत प्रवाह खंडीत झाल्याचे व पाणी पुरवठा बंद असल्याचे आढळून आले आहे.
(३) सदरहू कंपनीने टाळेबंदी लागू केली असल्याने देणी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) कामगार आयुक्त कार्यालयास दिनांक २८/११//२०१३ रोजीची टाळेबंदीची सूचना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०५/१२/२०१३ ते ३०/०१/२०१४ दरम्यान संघटना व व्यवस्थापनासमवेत चर्चा करण्याठी चार बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. तथापि चारही बैठकांना उभय पक्ष गैरहजर राहिले. त्यानंतर दिनांक १७/०२/२०१४ रोजीच्या बैठकीस व्यवस्थापन गैरहजर होते व कामगारांतर्फे धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू महासंघाने, व्यवस्थानाने घोषित केलेली टाळेबंदी बेकायदेशीर घोषित करण्यासाठी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे तक्रार युएलपी क्रमांक ३१९/२०१३ दाखल केलेली असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी शहरातील शिवाजी नगर भागातील देशी दारुचे दुकान बंद करण्याबाबत

**(२८) ५६७८३ (२०-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी शहरातील शिवाजी नगर भागातील देशी दारुचे दुकान

बंद करण्यासाठी स्थानिक महिलांनी दिनांक १ मे, २०१६ पासून आंदोलन करून सदर देशी दारूचे दुकान बंद करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, कोल्हापूर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कोल्हापूर आदिंना दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आंदोलनकर्त्यां महिलांच्या मागणीनुसार सदर देशी दारुचे दुकान बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दि.२८.९.२०१६ च्या आदेशान्वये सदर देशी मद्य अनुज्ञप्तीचे व्यवहार बंद करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) कस्टम हाऊस ते बंदर जेटी पर्यंतच्या सिमेंट कॉक्रीटीकरणाच्या रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत**

**(२९) ५७०४० (२३-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) कस्टम हाऊस ते बंदर जेटी पर्यंतच्या सिमेंट कॉक्रीटीकरणाच्या रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबतची तक्रार मच्छिमार ग्रामस्थ श्री.चंद्रकांत पाळेकर यांनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडे सन २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आतापर्यंत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१६) :** (१) होय.
(२) सदर कामाचा दोष निवारण कालावधी पूर्ण न झाल्याने संबंधित ठेकेदारामार्फत पावसाळा संपल्यानंतर नादुरुस्त काम दिनांक ३१.१२.२०१६ पर्यन्त त्वरित दुरुस्त करुन ठेकेदाराच्या खर्चाने पूर्ण करुन घेतले जाईल
(३) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील म्हाडाच्या भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(३०) ५७३४८ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील म्हाडाच्या अनेक जागेवर (भूखंडावर) अतिक्रमण झाले असल्याची बाब माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या जागेवर झालेली अतिक्रमणे निष्कासीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, भविष्यात अतिक्रमण होणार नाही, यासाठी शासनाकडून धोरणात्मक उपाययोजना आखण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश महेता (०२-१२-२०१६)** :(१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालनुसार म्हाडा वसाहतीतील काही जमीनींवर अतिक्रमण झालेले असून यापैकी बहूतांश अतिक्रमणे ही १९९५-२००० या पूर्वीची असल्याचे आढळले आहे.
(२) सदर अतिक्रमणांपैकी संरक्षणपात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाकरिता झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणामार्फत योजना राबविण्यात येत आहेत.
(३) म्हाडाच्या अहवालानुसार म्हाडा वसाहतींमध्ये नव्याने अतिक्रमण होऊ नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत विविध ठिकाणी मोकळया भूखंडाच्या संरक्षणाकरिता सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. तसेच मोकळया जागा/भूखंडांवर संरक्षण भिंती बांधण्यात येत आहेत.

या अनुषंगाने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालनात दि. २२.०६.२०१६ रोजी सयुंक्त बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेअंती मा. सभापती महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून दि. ११.०७.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये मुंबई मंडळाचे सर्व उप मुख्य अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापुर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून केलेल्या सर्वेक्षणात जिल्हयातील हजारो सहकारी संस्था बंद असल्याबाबत

**(३१) ५८२३७ (२२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापुर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून जिल्हयातील ६ हजार २३६ सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करण्यात आले असून या सर्वेक्षणात १ हजार ७८९ संस्था बंद असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-११-२०१६)** :(१) सर्वेक्षणामध्ये बंद ९९१ कार्यस्थगित ४०० व ठावठिकाणा नसलेल्या ४०७ असे एकूण १७९८ संस्था बंद असल्याचे आढळून आले आहे.
(२) ऑगस्ट, २०१६ अखेर सर्वेक्षणात बंद आढळून आलेल्या संस्थापैकी एकूण ५४६ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून ३३६ संस्थांचे पुनर्जिवन करण्यात आलेले आहे. उर्वरित ९१९ संस्थांवर अवसायकाची नेमणूक केली असून अवसायनाची चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेला आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याबाबत**

**(३२) ५८२७५ (२२-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील कलंबर सहकारी साखर कारखाना, गोदावरी मनार, जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना विक्रीस (रिस्पॉन्स) मिळत नसल्याने व अन्य कर्जदार संस्थांही कर्ज भरण्यात सहकार्य करीत नसल्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्हा परिषदेचे ६४ कोटी रुपये परत करण्याच्या कृती आराखड्यात अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव नांदेड जिल्हा परिषदेला सर्वाधिक आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे याबाबत आवश्यक कार्यवाही केली वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६)** : (१) होय, हे खरे आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने साखर कारखान्याची मालमत्ता विक्री करुन जिल्हा परिषदेचा निधी परत करण्याचा कृती आराखडा तयार केलेला होता. परंतु कारखान्याची मालमत्ता विक्रीची कार्यवाही चार वेळा करुनही मालमत्ता विक्रीसाठी प्रतिसाद मिळालेला नाही.
(२) व (३) सदरचे कारखाने हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विक्रीस काढलेले असून कारखान्याची विक्री होताच सदरच्या रकमा परत करणेविषयी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सुचित करण्यात आलेले असून बँकेनेही त्याप्रमाणे आश्वासित केलेले आहे.

---

**शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) ९४ टक्के भावी शिक्षक नापास झाले असून केवळ ५.६९ टक्के शिक्षक उत्तीर्ण झाले असल्याबाबत**

**(३३) ५८३६९ (२२-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जानेवारीमध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) निकाल जाहीर झाला असून सदर परिक्षेत ९४ टक्के भावी शिक्षक नापास झाले असून, केवळ ५.६९ टक्के शिक्षक उत्तीर्ण झाले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टीईटीच्या परीक्षेत पहिली ते पाचवीसाठींच्या शिक्षकांचा पेपर फुटला असल्याने फेरपरीक्षा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्यावर्षीही अवघा ४.९२ टक्के निकाल लागला होता यावर्षी त्यामध्ये फक्त १ टक्कयांनी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तिस-या टीईटीच्या परीक्षेतही राज्यातील लाखो शिक्षक नापास ठरल्याने राज्यातील शालेय शिक्षणाची गुणवत्ताच धोक्यात आली असल्याची प्रतिक्रिया शिक्षण तज्ज्ञांमध्ये उमटल्या आहेत, हे खरे आहे काय

(५) असल्यास, राज्यातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-१२-२०१६) :**(१) शिक्षक पात्रता परीक्षा ही परीक्षार्थी केवळ पात्र किंवा अपात्र निश्चित करणारी परीक्षा असून माहे जानेवारी, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या पेपर क्र.२ च्या निकालानुसार ५.६९ टक्के परीक्षार्थी पात्र ठरले, हे खरे आहे.

(२) सदर फेरपरीक्षा दि.०७/०६/२०१६ रोजी घेण्यात आली.

(३) शिक्षक पात्रता परीक्षा, पेपर क्र.२ च्या निकालामध्ये १ टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे.

(४) खरे नाही.

(५) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत विविध उपक्रम तसेच शिक्षकांकरिता प्रशिक्षण इत्यादी विविध कार्यक्रम शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरिता राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य बँकेने चार सहकारी साखर कारखान्यासह एका सहकारी सुत गिरणीच्या विक्रीची नोटीस प्रसिध्द केल्याबाबत**

**(३४) ५८४४३ (२२-०८-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य बँकेने चार सहकारी साखर कारखान्यासह एका सहकारी सुत गिरणीच्या विक्रीची नोटीस प्रसिध्द केल्याची बाब दिनांक १ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी राज्य बँकेने विक्री केलेल्या ३५ कारखान्यांच्या विक्रीत १० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची चौकशी 'ईडी' मार्फत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने साखर कारखाने सुरु ठेवण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने पद्मश्री डॉ.व्ही.व्ही. पाटील सहकारी साखर कारखाना लि.जि.बीड, जिजामाता सहकारी साखर कारखाना लि.बुलढाणा, जयशिवशंकर सहकारी साखर कारखाना लि., नांदेड व यशवंत सहकारी साखर कारखानरा लि. पुणे या चार सहकारी साखर कारखान्यांची विक्रीची जाहिरात दिनांक १ मे, २०१६ रोजी दिलेली नसून दि.३० एप्रिल, २०१६ रोजी दै.लोकसत्ता व दि.फायनान्सियल एक्सप्रेस या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने शेतक-यांना अडीच लाख रुपयांपर्यंतच्या पिक आणि मुदत कर्जासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वर्षभरासाठी माफ केल्याबाबत**

**(३५) ५९१११ (२२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतक-यांना अडीच लाख रुपयांपर्यंतच्या पिक आणि मुदत कर्जासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वर्षभरासाठी माफ करण्याचा निर्णय माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात व त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्ज सुलभरीत्या व तातडीने उपलब्ध होण्यासाठी कोणत्या स्वरुपाची प्रिक्रिया राबविण्यात आली आहे व त्याचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला आहे,
(३) तसेच प्रश्न भाग १ बाबत आतापर्यंत किती शेतकऱ्यांची पीक कर्जासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे,
(४) असल्यास, शासनाने शेतक-यांना पिक कर्जासाठी आणि मुदत कर्जाची फेररचना करण्याचे जिल्हा मध्यवर्ती व राष्ट्रीयकृत बँकांना दिलेले उदिष्ट पूर्ण केले आहे काय,
(५) असल्यास, शासन स्तरावर याबाबत चौकशी करण्यात आली काय व त्या चौकशीचे स्वरुप काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील शेतक-यांना द्यावयाच्या पीक कर्जाबाबत तसेच दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांच्या पीक कर्ज पुनर्गठनाबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दि.२८.०४.२०१६ रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी तसेच सहकार विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांना सकारात्मक पुढाकार घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.११.५.२०१६ रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समिती सभेमध्ये राज्यातील सर्व बँकांना (सार्वजनिक क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील तसेच ग्रामीण बँका व जिल्हा सहकारी बँका) पीक कर्ज वितरणाच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी दि.३.६.२०१६ व २७.६.२०१६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांच्यासमवेत वार्तालाप करुन आवश्यक कार्यवाहीच्या सुचना दिल्या आहेत.

मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार महसूल व वन विभागामार्फत रु.१.०० लाख ते रु.२.५० लाख पीक कर्जावर एक वर्षासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचे आदेश दि.४.६.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) दि.३०.९.२०१६ अखेरपर्यंत रु.३७६७७ कोटी खरीप पिक कर्ज लक्षांकापैकी ४७.८३ लाख शेतक-यांना रु.३२७३२ कोटीचे पिक कर्ज वाटप केले आहे. त्यापैकी ज्या शेतक-यांनी रु.२.५० लाख पर्यंत कर्ज घेतले आहे, त्यांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे.
(४) सन २००१६-१७ मध्ये खरीप २०१५ साठी पीक कर्ज वाटप करण्यात आलेल्या राज्यातील एकूण ६,८५,३३० शेतक-यांनी रु.५१२४.९३ कोटीचे पुनर्गठन केले आहे. मुदती कर्जाच्या फेररचनेसाठी शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना व राष्ट्रीयकृत बँकांना उद्दिष्ट दिलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील द्विदल धान्य तथा डाळ उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीसाठी अन्न-धान्य/कडधान्य**

**साठ्याच्या उत्पादनात भरीव अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत.**

**(३६) ५९५०८ (१०-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः प्रादेशिक विभागनिहाय जिल्हास्तरीय द्विदल धान्य तथा डाळ उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीसाठी खरीप हंगामातील नियोजित अन्न-धान्य-कडधान्य साठ्याच्या उत्पादनात भरीव अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबतची मागणी विविध जिल्ह्यातील शेतकरी संघाने, कृषक वर्गाने तसेच डाळ उत्पादक संघाच्या प्रवर्तक, लोकप्रतिनिधी तसेच डाळ उत्पादक संघाच्या प्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सार्वजनिक शिधावाटप नियंत्रनालयाचे शिधावाटप नियंत्रक/सार्वजनिक धान्य वितरण अधिकारी यांच्याकडे दिनांक २३ मे २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात डाळींच्या लागवडीखालील क्षेत्र वाढावे व डाळ उत्पादक शेतक-यांना दर हेक्टरी अनुदान मिळावे याकरिता अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून विशेष योजना आखली जाणार असल्याचे दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डाळ उत्पादक शेतक-यांना डाळीचे सुधारित बियाणे, खते, वितरण व्यवस्था, उपलब्ध गोदाम, डाळीचा बफर स्टॉक तयार करणे अशा सुविधा शासन पुरविणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्याप किती भरडधान्य उत्पादक संस्थांना सदरची मदत प्रत्यार्पित करण्यात आली आणि त्यांच्याकडून लेव्ही रुपात शासनाकडे किती डाळीचा साठा उपलब्ध होण्याची शक्यता आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
अशा स्वरुपाची कोणतीही मागणी शासनास प्राप्त झालेली नाही.
(२) कडधान्य पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २००७-०८ पासून राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य अंतर्गत रक्कम रु.२४९.०७ कोटी इतक्या कृती आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत संकरित तूर ICPH २७४० या वाणाचे उत्पादनासाठी सहाय्य देण्यात येत आहे. यासाठी रक्कम रु.३.२४ कोटी इतकी तरतूद आहे.
(३) व (४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य कार्यक्रमांतर्गत सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके, अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचे प्रमाणित बियाणे उत्पादन व वितरण, सुधारित कृषी औजारे, एकात्मिक कीड नियंत्रण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, गोदाम बांधकाम, शेततळे, बीज प्रक्रिया युनिट, मिनी दाल मिल इ. बाबींसाठी अर्थसहाय्य

देण्यात येते. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत संकरित तूर ICPH २७४० या वाणाचे बियाण्यासाठी १०० टक्के अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सध्या राज्यात लेव्ही बंद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भासह राज्यातील वैधमापन विभागात पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत व पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) ५९७५० (१०-०८-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वैधमापन विभागात पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नाहीत तसेच विदर्भातील जिल्ह्यात नागपूर १५, वर्धा ३, गडचिरोली ३, चंद्रपूर ५ व भंडारा-गोंदिया ५ निरिक्षक ग्राहकाच्या सेवेत व व्यापारावर नियंत्रण ठेवत असुन ही संख्या फारच अपूरी असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या व्यवस्थेमुळे बाजारपेठेत ग्राहकांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागात नवीन पदभरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (२९-११-२०१६) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

विदर्भातील सर्व जिल्ह्याकरिता निरिक्षकांची मंजूर असलेली सर्व पदे भरलेली आहे.

---

**हिरडगांव( ता.श्रीगोंदा,जि. अहमदनगर) येथील साईकृपा कारखान्यावर पंजाब नॅशनल बँकेने थकबाकीमुळे जप्ती आणल्याबाबत**

**(३८) ५९९५५ (२२-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि. अहमदनगर) येथील साईकृपा कारखान्यांवर पंजाब नॅशनल बँकेने माहे मार्च, २०१६ मध्ये जप्ती आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-११-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.
पंजाब नॅशनल बँकेने साईकृपा साखर कारखान्याची जप्ती घेतलेली नसून प्रतकात्मक ताबा घेतलेला आहे.
(२) साईकृपा शुगर अॅण्ड अलाईड इंड हिरडगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर हा साखर कारखाना खाजगी असून संबंधित पंजाब नैशनल बँकेने कारखान्यास दिलेल्या कजाग्स शासनाने काणतीही हमी दिलेली नाही. सदरचा कर्ज व्यवहार उभयतांमध्ये असल्याने यात शासन हस्तक्षेप करु शकत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर येथे जिल्हा परिषदेच्य शाळातील मुलांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण देण्याबाबत

**(३९) ५९९८३ (२२-०८-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर येथे जिल्हा परिषदेच्या शाळातील मुलांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक सॉफ्टवेअर शिक्षण विभागाने दिले होते. दोन वर्षापासून राबविल्या जात असलेल्या या योजनेस शाळांचाही चांगला प्रतिसाद मिळत असताना शिक्षण विभागाने काहीही कारण न देता ही योजनाच बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१६मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांतील मुलांना ई लर्निंग चे धडे देण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-१२-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
अहमदनगर जिल्हा परिषदेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक सॉफ्टवेअर व अन्य साहित्यखरेदी ही नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हा परिषद फंड व मानव विकास विभागाच्या निधीमधून केली होती. तथापि प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शालेय शिक्षण विभागाच्या उपक्रमातून राज्यातील तंत्रस्नेही शिक्षकांनी तयार केलेले शैक्षणिक प्रणाली स्वनिर्मित व मोफत प्राप्त होत असल्यामुळे त्याचा वापर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुष्काळी परिस्थितीमुळे कर्ज वुसली थांबविण्यात आली असताना अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांची कर्ज वसुली सुरु असल्याबाबत**

**(४०) ६०६१८ (२२-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदेशानुसार दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची कर्ज वुसली थांबविण्यात आली आहे असे असुनही अहमदनगर जिल्हा सहकारी बँक मुळा सहकारी साखर कारखाना सयुक्तपणे मुहा सहकारी बँक या संस्थांनी कर्ज वसुली सुरु ठेवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या बाबत चौकशी केली आहे काय,

(३) तद्नुसार काय कार्यवाही करण्यात आली व करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. शेतक-यांनी त्यांच्या ऊस भरणा रकमेमधून स्वत:हून स्वखुशीने दिलेली वसुली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व मुळा सहकारी बँक लि.सोनई यांनी स्विकारलेली आहे.

(२) याबाबत शेतक-यांची तक्रार प्राप्त झालेली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई वांद्रे येथील म्हाडा भवनात सुरु असलेल्या शासकीय कार्यालयांनी भाडयाची रक्कम न भरल्याबाबत**

**(४१) ६०६५४ (२९-०८-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे येथील म्हाडा भवनात राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळासह अन्य शासकीय कार्यालये भाडेतत्वावर कित्येक वर्षापासून सुरु असून या कार्यालयांनी भाड्याचे २० कोटी रुपये म्हाडाला भरले नसल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत भाडे म्हाडाला भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-१२-२०१६) :**(१) व (२) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई वांद्रे येथील गृहनिर्माण भवनातील इमारतीत भाडेतत्वावर जागा देण्यात आलेल्या राज्य महिला आयोग, सहदुय्यम निबंधक, महात्मा फुले महामंडळ, जिल्हा उपनिबंधक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त

विकास महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ विमा संचालनालय या शासकीय कार्यालयांकडून तसेच नॅशनल लायब्ररी या शासन अनुदानित कार्यालयाकडून थकित असलेल्या भाड्याची रक्कम रु. २० कोटी नसून दि. १.११.२०१३ ते ३१.३.२०१६ पर्यंतची एकूण थकित रक्कम रु.१७,०३,२०,५४०/- इतकी असून सदरहू थकीत रक्कम भरण्याबाबत म्हाडा प्राधिकरणाच्या दि. १.२.२०१६ रोजीच्या पत्राने संबंधित कार्यालयांना सूचना देण्यास आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर येथे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे रक्षण करण्यासाठी कलम १४४ लागू करण्यात आल्याबाबत**

**(४२) ६०६६८ (१०-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे रक्षण करण्यासाठी कलम १४४ लागू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मोठया भागांमध्ये पाण्याची टंचाई असताना लातूर येथेच कलम १४४ लागू करण्याची कारणे काय होती,

(३) तसेच आगामी काळात अशी स्थिती निर्माण होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

लातूर शहरातील टँकर पॉईट असलेल्या पाण्याच्या टाक्यांच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले होते.

(२) सन २०१६ च्या टंचाईकाळात लातूर शहरास टँकरने पाणी पुरवठा करताना टँकर पॉईट असलेल्या पाण्याच्या टाक्यांवर नागरिकांची गर्दी होत होती. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून पाण्याच्या टाकीच्या परिसराच्या मर्यादित क्षेत्रात १४४ कलम लागू करण्यात आले होते

(३) पाणीटंचाई निवारणार्थ प्रत्येक वर्षी प्रत्येक जिल्ह्यासाठी आक्टोबर ते जून या नऊ महिन्यांच्या कालावधीकरिता पाणी टंचाई कृती आराखडा तयार करुन त्याआधारे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेतक-यांना एफआरपीप्रमाणे ऊसाचे पैसे न देणा-या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४३) ६०९७१ (२२-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना एफ.आर.पी. नुसार ऊसाचे पैसे न देणाऱ्या राज्यातील ४५ साखर कारखान्यांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या कारखान्यांची नावे काय आहेत,

(३) असल्यास, राज्य शासनाने या कारखान्यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-१०-२०१६) :** (१) होय.

शेतक-यांना एफआरपी नुसार ऊसाचे पैसे न देणा-या राज्यातील साखर कारखान्यांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार गळीत हंगाम २०१४-१५ व २०१५-१६ मधील FRP देयके जादा थकबाकी होणा-या एकूण ६३ साखर कारखान्यांवर ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार RRC कारवाई करणे व झोनिंग आदेश, १९८४ मधील तरतुदीनुसार गाळप परवाना रद्द करुन दंडात्मक कारवाई करणे इ. कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) ६३ साखर कारखान्यांची यादी सोबत जोडली आहे.

(३) थकीत FRP संदर्भात खालील प्रमाणे कारवाई केली आहे :-

अ) हंगाम २०१४-१५ मधील २३ कारखान्यांवर रु.३१२.७३ कोटी व हंगाम २०१५-१६ मधील १३ साखर कारखान्यांवर रु.१६४.५२ कोटी रक्कमेची RRC कारवाई करण्यात आली आहे.

ब) हंगाम २०१४-१५ चे थकीत FRP मुळे हंगाम २०१५-१६ चे गाळप परवाने रद्द करुन १० कारखान्यांवर रु.९३.६३ कोटी रक्कमेचा दंड व हंगाम २०१५-१६ मधील थकीत FRP मुळेही १७ कारखान्यांवर रु.१८३.८९ कोटी रक्कमेच्या दंडाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.६०९७१ चे सहपत्र**

## सन २०१५-१६ चे हंगामातील थकीत FRP बाबत RRC तपशिल.

**(३१.०८.२०१६ पर्यन्त)**

| अ. क्र. | साखर कारखाना | प्रकार | RRC आदेश दिनांक | RRC रक्कम (रु.लाख) | वसुली | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वसंतदादा शेतकरी, जि.सांगली | सहकारी | २९/०४/२०१६ | ३६१४.३५ | ३६१४.३५ | बाकी निरंक |
| २ | विजयशुगर, करकंब, जि.सोलापूर | खाजगी | २९/०४/२०१६ | ११७३.७९ | ० | ११७३.७९ लाख बाकी मा.मंत्री महोदय यांचेकडे अपिल. |
| ३ | संतकुर्मदास, ता.माढा, जि.सोलापूर | सहकारी | २९/०४/२०१६ | ५४४.१५ | २५९.९१ | २८४.२४ लाख बाकी जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ४ | आदिनाथ ता.करमाळा, जि.सोलापूर | सहकारी | २९/०४/२०१६ | ५४२.२३ | ० | ५४२.२३ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ५ | चोपडा शेतकरी, ता.चोपडा, जि.जळगांव | सहकारी | २९/०४/२०१६ | ८८०.१६ | ८०५.२५ | ७४.९१ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ६ | माणगंगा ससाका, जि.सांगली | सहकारी | १०/०५/२०१६ | १४२१.७२ | १४२१.७२ | बाकी निरंक |
| ७ | यशवंत शुगर, खानापूर, जि.सांगली | खाजगी | १०/०५/२०१६ | १७०८.७१ | ७८४.२३ | ९२४.४८ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ८ | श्रीशंकर, ता.माळशिरस, जि.सोलापूर | सहकारी | १०/०५/२०१६ | २८०७.७१ | ४४.३५ | २७६३.३६ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ९ | सिध्देश्वर, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद | सहकारी | १०/०५/२०१६ | ६२३.७४ | ६२३.७४ | बाकी निरंक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | वसंत, पुसद, जि.यवतमाळ | सहकारी | १८/०५/२०१६ | ५५.३२ | ३.४३ | ५१.८९ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| ११ | महाराष्ट्र शेतकरी शुगर्स, जि.परभणी | खाजगी | १८/०५/२०१६ | ४२२.४७ | ० | ४२२.४७ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| १२ | राजगड, अनंतनगर, ता.भोर, जि.पुणे | सहकारी | १८/०५/२०१६ | १०४०.२६ | ३६८.६७ | ६७१.५९ लाख बाकी. जिल्हाधिकारीस्तरावर प्रलंबित. |
| १३ | भिमा (टाकळी) ससाका, जि.सोलापूर | सहकारी | ११/०८/२०१६ | १६१७.४३ | १६१७.४३ | बाकी निरंक |
| | | | **एकूण** | **१६४५२.०४** | **९५४३.०** | **६९०८.९६ लाख बाकी** |

**विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ६०९७१ च्या उत्तरासोबतचे सहपत्र**
**सन २०१४-१५ चे हंगामातील थकीत FRP बाबत RRC तपशिल.**
**(दि.३१/०८/२०१६ पर्यन्त)**

| **अ. क्र.** | **साखर कारखाना** | **प्रकार** | **२०१५-१६ मध्ये सुरु/बंद** | **RRC आदेश दिनांक** | **RRC रक्कम (रु.लाख)** | **वसुली रक्कम (रु.लाख)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कुंटुरकर शुगर्स, जि.नांदेड | खाजगी | सुरु | ०२/०२/२०१५ | ४६३.३२ | ४३६.३२ | बाकी निरंक |
| २ | जयलक्ष्मी शुगर्स लि. उस्मानाबाद | खाजगी | बंद | ०२/०२/२०१५<br>२०/०८/२०१५ | ३६९.३४<br>३९९.८६ | ०० | रु.७६९.२० लाख बाकी. मा.खंडपीठ औ.बाद येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ. |
| ३ | कुमदा-रयत | खाजगी | सुरु | ०२/०२/२०१५ | ६१६.९५ | २१७२.१२ | रु.९८१.६२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ससाका, जि.सातारा | | | २२/०४/२०१५ | २५३६.७९ | | लाख बाकी. महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचा कायदा-२०१३ चे कलम-७ नुसार न्यायालयाम ध्ये तक्रार दाखल करणेस RJD, पुणे यांना सूचना दिलेल्या आहेत. |
| ४ | आर्यन शुगर्स, जि.सोलापूर | खाजगी | बंद | २६/०५/२०१५ | २११३.५३ | ८.४० | २१०५.१४ लाख बाकी. RRC प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३ वेळा जाहीर लिलाव प्रक्रीया राबविण्यात आली. तथापी अंतिमत: कार्यवाही झालेली नाही. |
| ५ | महाराष्ट्र शेतकरी शुगर्स, जि.परभणी | खाजगी | बंद | ०३/०६/२०१५ | ४४७८.१० | ३९०८.३६ | ५६९.७४ लाख बाकी. |
| ६ | माणगंगा ससाका, जि.सांगली | सहकारी | सुरु | ०३/०७/२०१५ | ३०६१.७३ | ३०६१.७३ | बाकी निरंक |
| ७ | चोपडा ससाका, जि.जळगांव | सहकारी | बंद | ०३/०७/२०१५ | २७०२.७२ | १५८६.७९ | रु.१११५.९३ लाखबाकी. मा.मंत्री सहकार यांचे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | समोर RRC संबंधी सुनावणी सुरु आहे. |
| ८ | श्री साईबाबा शुगर्स, जि.लातूर | खाजगी | बंद | ०३/०७/२०१५ | १८११.४६ | ४८४.७२ | रु.१३२६.७४ लाख बाकी. |
| ९ | श्री साईकृपा शुगरयु.२ अहमदनगर | खाजगी | बंद | १२/०८/२०१५ | ३८२५.१० | १४३७.५१ | रु.२३८७.५९ लाख बाकी. प्रकरण न्यायप्रविष्ठ. |
| १० | विजय शुगर, } सोलापूर विठ्ठलससाका } | खाजगी/सहकारी | सुरु | २८/०८/२०१५ | ९२३.५२ | ७९.४१ | ८४४.११ लाख बाकी. जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित. |
| ११ | स्वामीसमर्थ, जि.सोलापूर | सहकारी | बंद | १८/०१/२०१६ | ९०७.०५ | ० | ९०७.०५ लाख बाकी. जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित. |
| १२ | जयभवानी, गेवराई, जि.बीड | सहकारी | बंद | १८/०१/२०१६ | ४७०.९४ | ० | ४७०.९४ लाख बाकी. जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित. |
| १३ | पुर्णा ससाका, जि.हिंगोली | सहकारी | सुरु | १५/०३/२०१६ | ४७७.५८ | ० | कारखान्याने रक्कम मा.खंडपीठ औरंगाबाद येथे जमा केली आहे. |
| १४ | सिध्दीशुगरलि. जि.लातूर | खाजगी | सुरु | १५/०३/२०१६ | १५१.७८ | ० | १५१.७८ लाख बाकी. प्रकरण न्यायप्रविष्ठ. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | शंभु महादेव शुगर, जि.उस्मानाबाद | खाजगी | सुरु | १५/०३/२०१६ | २०६.८३ | ० | रु.२०६.८३लाख बाकी. मा.खंडपीठ औरंगाबाद येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ. |
| १६ | आदिनाथ ससाका, जि.सोलापूर | सहकारी | सुरु | २२/०३/२०१६ | १३०५.२७ | ० | १३०५.२७ लाख बाकी. मा.मंत्री सहकार महोदय यांचेकडे अपिल दाखल. सुनावणी सुरु आहे. |
| १७ | श्रीशंकर ससाका, जि.सोलापूर | सहकारी | सुरु | २२/०३/२०१६ | ९१५.७१ | ९१५.७१ | बाकी निरंक |
| १८ | संत कुर्मदास ससाका, जि.सोलापूर | सहकारी | सुरु | २२/०३/२०१६ | १८६.२१ | ० | १८६.१९ लाख बाकी. जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित. |
| १९ | शंकररत्न शुगर्स, अलेगांव, जि.सोलापूर | खाजगी | सुरु | २२/०३/२०१६ | ५४०.४२ | १८.५९ | ५२१.८३ लाख बाकी . |
| २० | छत्रपती ससाका, जि.पुणे | सहकारी | सुरु | ०१/०४/२०१६ | ८६५.१२ | ८६५.१२ | बाकी निरंक |
| २१ | भीमा ससाका, पाटस, जि.पुणे | सहकारी | सुरु | ०६/०६/२०१६ | १२५४.४५ | ० | १२५४.४५ लाख बाकी. मा.मंत्री सहकार महोदय यांचेकडे अपिल दाखल. सुनावणी सुरु आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | मधुकर ससाका, जि.जळगाव | सहकारी | सुरु | ०६/०६/२०१६ | ४६१.५७ | ० | मा.मंत्री सहकार महोदय यांचेकडे अपिल दाखल. सुनावणी सुरु आहे. |
| २३ | भिमाशंकर शुगर्स, जि.उस्मानाबाद | खाजगी | बंद | ११/०८/२०१६ | २२७.२३ | ० | मा.खंडपीठ औरंगाबाद येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ. |
| | एकूण | | | | **३१२७२.५८** | **१४९७४.७८** | **१६२९७.८० लाख बाकी** |

## विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ६०९७१ च्या उत्तरासोबतचे सहपत्र

| **गाळप हंगाम २०१५-१६चे गाळप परवाना रद्द व दंडात्मक कारवाई बाबत** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गाळप हंगाम २०१४-१५ मधील FRP प्रमाणे रक्कम अदा न केलेले कारखाने यादी | | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | साखर कारखान्याचे नांव | सहकारी /खाजगी | दिनांक | दंडाची रक्कम(रु.लाख) |
| १ | सांगली | वसंतदादा | सहकारी | २/२/२०१६ | २५१५.२० |
| २ | पुणे | भिमा-पाटस | सहकारी | ३/११/२०१६ | १९४४.७५ |
| ३ | सोलापूर | आदिनाथ | सहकारी | १/१५/२०१६ | ३७७.९३ |
| ४ | सोलापूर | मकाई | सहकारी | १/१५/२०१६ | ७६७.४० |
| ५ | सोलापूर | कुर्मदास | सहकारी | २/२४/२०१६ | १५०.८१ |
| ६ | सोलापूर | शिवरत्न उद्योग लि करकंब | खाजगी | १/१५/२०१६ | ४७१.७९ |
| ७ | सोलापूर | शिवरत्न उद्योग लि आलेगाव | खाजगी | २/२४/२०१६ | १०७२.५२ |
| ८ | अहमदनगर | वृध्देश्वर | सहकारी | ३/११/२०१६ | ११७२.४६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | जळगांव | मधुकर | सहकारी | १/१५/२०१६ | ५६९.९३ |
| १० | जळगांव | चोपडा | सहकारी | ३/११/२०१६ | ३१९.८५ |
| | | | | **एकुण** | **९३६२.६४** |

गाळप हंगाम २०१५-१६ मधील FRP प्रमाणे रक्कम अदा न केलेले कारखाने यादी

| अ.क्र. | जिल्हा | साखर कारखान्याचे नांव | सहकारी /खाजगी | दिनांक | दंडाची रक्कम (रु.लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली | माणगंगा | सहकारी | ४/२९/२०१६ | ८६१.६८ |
| २ | सांगली | यशवंत-खानापूर | खाजगी | ४/२९/२०१६ | ८३४.४६ |
| ३ | पुणे | छत्रपती | सहकारी | २/२४/२०१६ | २१३६.१६ |
| ४ | पुणे | राजगड | सहकारी | ५/१०/२०१६ | ८६१.५३ |
| ५ | सोलापूर | शंकर | सहकारी | ४/२९/२०१६ | ८८९.७६ |
| ६ | सोलापूर | सिताराम महाराज खर्डी | खाजगी | ६/६/२०१६ | ९३६.२६ |
| ७ | औरंगाबाद | सिध्देश्वर | सहकारी | ४/२९/२०१६ | ३४७.१८ |
| ८ | परभणी | महाराष्ट्र शेतकरी | खाजगी | ५/१०/२०१६ | ५९६.९२ |
| ९ | यवतमाळ | वसंत - पुसद | सहकारी | ५/१०/२०१६ | ६८.०० |
| १० | जालना | समृधी शुगर | खाजगी | ८/८/२०१६ | ६५४.३१ |
| ११ | औरंगाबाद | सचिन घायाळ (संत एकनाथ) | सहकारी | ८/८/२०१६ | ४९७.६३ |
| १२ | अहमदनगर | श्रीसाईकृपा शुगर १ देवदैठण | खाजगी | ८/८/२०१६ | ८७५.८२ |
| १३ | नाशिक | आर्मस्ट्रॉंग इं.प्रा.लि. | खाजगी | ८/८/२०१६ | ५७२.१२ |
| १४ | अहमदनगर | कुकडी | सहकारी | ८/८/२०१६ | २५९५.२३ |
| १५ | सोलापूर | जकराया शुगर | खाजगी | ८/८/२०१६ | १५१३.२६ |
| १६ | सांगली | श्री महांकाली | सहकारी | ८/८/२०१६ | १२८८.२० |
| १७ | सोलापूर | श्री विठ्ठल | सहकारी | ८/८/२०१६ | २८६०.५१ |
| | | | | **एकुण** | **१८३८९.०३** |

**नायगाव बाजार (जि.नांदेड) तालुक्यातील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार मिळत नसल्याबाबत**

**(४४) ६१०३१ (२२-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव बाजार (जि.नांदेड) तालुक्यात असलेल्या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार मिळत नसल्याने त्यांना रोजगारासाठी मुंबई, पुणे सीमेलगत असलेल्या तेलंगणा, आंध्रप्रदेशासह अन्य राज्यात जावे लागत असल्याचे दिनांक ४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड, हैद्राबाद महामार्गावर पंचतारांकित एम.आय.डी.सी. उभारण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपली शेतजमीन शासनास दिली तेथे परप्रांतीय कामगारांना रोजगार दिला जात असल्याचे वास्तव समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक कामगारांना रोजगारापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी करुन त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-११-२०१६) :**(१) सद्य:स्थितीत नायगाव बाजार तालुक्यातील कृष्णूर पंचातारांकीत औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यरत असलेल्या उद्योग घटकांमध्ये एकूण ६९६ कामगारांपैकी ५४२ कामगार स्थानिक असल्याचे उद्योग संचालनालयाने कळविलेले आहे.
(२) राज्य शासनाच्या दिनांक १७/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार ८० टक्के पेक्षा जास्त स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि. सोलापुर) तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामतील पीक विम्याची मदत अद्याप मिळाली नसल्याबाबत**

**(४५) ६१०४१ (२२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुक्यातील जि. सोलापुर सुमारे ५७ हजार ४९६ शेतकऱ्यांना फक्त सन २०१५-१६ च्या कालावधीतील खरीप व रब्बी हंगामतील पीक विम्याची एकूण ५० कोटी १३ लाख रुपयांची मदत अद्याप मिळाली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असलस, यासंदर्भात निर्णय घेऊन येथील शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६)** :(१) नाही.
(२) सोलापूर जिल्ह्यातील एकूण १३ बँकांच्या ७४७९६ लाभार्थी सभासदांना रु.५४,३७,१५,०५३/- इतकी रक्कम पीक विम्यासाठी मंजूर झाल्यानुसार संबंधितांना अदा केली आहे. त्यापैकी खरीप २०१५ सालाकरीता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस एकूण ५२३०९ सभासदांना पीक विमा क्लेमची रु.४०७४.१२ लाख एवढी रक्कम प्राप्त झाली. त्यापैकी मंगळवेढा तालुक्यातील १४७९४ सभासदांकरीता रक्कम रु.१२८८.०० लाख एवढी होती. सदर संपुर्ण रक्कम सर्व शेतकऱ्यांना विमा क्लेमनुसार अदा केली आहे.
(२) सर्व पात्र शेतक-यांना प्राप्त पीक विम्याची रक्कम अदा केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक औरंगाबादने ५२ सहकारी संस्थांचे थकीत कर्ज माफ केलेबाबत

**(४६) ६१३१७ (२२-०८-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक औरंगाबादने ५२ सहकारी संस्थांचे थकीत कर्ज माफ केले. या सर्व संस्था बँकेचे आजी माजी संचालक व लोकप्रतिनिधी व त्यांच्या नातेवाईकाच्याच आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसुल होत नसलेले कर्ज माफ करण्याचे अधिकार ऑडिट वर्ग-ब असलेल्या बँकांनाच आहेत. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही पुर्वी ऑडीट वर्ग-ब मध्ये नव्हती. असे असतांना ५२ संस्थांचे व्याज व मुद्दल मिळून तब्बल ८ कोटी ५२ रुपये थकलेले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशिरपणे केलेल्या कर्जमाफीस जबाबदार असणाऱ्यांवर व थकीत संस्थावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :** (१) नाही.
(२) औरंगाबाद जिलहा मध्यवर्ती सहकारी बँकेचे एकूण ५२ सहकारी संस्थांकडे रु.८.५२ कोटी थकीत होते, हे खरे आहे.
दि. २०.०९.२०१४ च्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक साधारण सभेतील ठराव क्र.८ नुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम १९६१ मधील नियम ४९ मधील तरतूदींनुसार एकूण ५२ सहकारी संस्थांचे थकीत कर्ज मुद्दल व व्याज एकूण रु.८.५२ कोटी बँकेने वसुलीचा हक्क कायम ठेवू थकीत कर्ज निर्लेखित केलेले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक औरंगाबादचे सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालानुसार बँकेस लेखापरिक्षण वर्ग ब मिळालेला आहे.

(३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद कार्यालयाचे आदेश दि.३१.१२.२०१५ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत बँकेने ५२ सहकारी संस्थांच्या निर्लेखित केलेल्या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी श्री.छत्रीकर डि.टी., विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), औरंगाबाद यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केलेला असून अहवालात नमूद केले आहे की, बँकेने सहकार कायद्यातील तरतूदीनुसार निर्लेखनाची कार्यवाही विहीत पध्दतीने केलेली आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (ता. जि.नांदेड) येथे पाणी टंचाई निवारण्यासाठी मंजूर केलेल्या निधीचे योग्य नियोजन करण्याबाबत**

**(४७) ६३०२४ (१०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (ता. जि.नांदेड) येथे गत दोन वर्षापासून अत्यल्प पर्जन्यमान असल्याने कोरडया दुष्काळाची स्थिती निर्माण झाली असून त्याचे पडसाद सदरहू विभागातील प्रत्येक क्षेत्रावर होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणची पाणी टंचाई निवारण्यासाठी शासनाकडून सुमारे पावणे सात कोटी रुपये मंजूर झाले असून सदर निधी शासनाने उक्त विभागात दिला आहे काय, असल्यास त्याचे नियोजन योग्य पध्दतीने करण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मुखेड तालुक्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१५ ते जून, २०१६ या कालावधीकरिता १२६ गावे व १२६ वाडी तांडयांकरिता ५४४ उपाययोजनांचा समावेश असलेला रु. १२७४.२२ लक्ष किंमतीचा पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी रु. ६४२.९५ लक्ष किंमतीच्या २८० उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत.

त्यासाठी रु. ७३.१० लक्ष एवढा निधी मुखेड तालुक्यासाठी वितरित केला असून उर्वरित निधी वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या गैरव्यवहाराबाबत

**(४८) ६४००६ (२२-०८-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मुख्य शाखेला दिनांक २८ मे, २०१६ रोजी आग लागून अनेक महत्वाची कागदपत्रे व गैरव्यवहाराची कागदपत्रे जळून खाक झाली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील आगीचे सी.बी.आय. मार्फत किंवा वरिष्ठ यंत्रणेमार्फत चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ३२ कोटी रुपयाची वसुली तात्काळ करण्याबाबत औरंगबाद खंडपिठाने जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील ३२ कोटी रुपयाचा गैरव्यवहार करणाऱ्या आरोपींकडून सदरची वसुली करण्याबाबत सहकार विभागाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१६) :**(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेल्या बँकेच्या जुन्या रेकॉर्डला दि.२४.५.२०१६ रोजी पहाटे ४ ते ५ च्या सुमारास आग लागली होती. सद आगीत बँकेचे कोणतेही महत्वाचे रेकॉर्ड व बँकेच्या आर्थिक गैरव्यवहारतील रेकॉर्ड जळालेले नाही.

(२) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वरीलप्रमाणे लागलेल्या आगीचे सी.बी.आय.मार्फत किंवा वरिष्ठ यंत्रणेमार्फत चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई करण्याबाबत कोणताही तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही. तथापि, बँकेत लागलेल्या आगीबाबत बीड शहर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर म्हणून आकस्मित जळीत घटना क्र.१/२०१६ अन्वये नोंद झालेली असून सदरच्या प्रकरणाची चौकशी पोलीस स्टेशन बीड यांचेमार्फत सुरु आहे.

(३) होय. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कलम ८८ अन्वयेच्या चौकशी अहवालाप्रमाणे आर्थिक नुकसानीची निश्चित केलेली रक्कम रु.३१.७७ कोटी चार आठवड्याचे आत वसूल करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र.११०४४/२०१६ मध्ये दिनांक १०/०६/२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयेच्या अहवालात बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या संचालक व अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द निश्चित केलेल्या एकूण रु.३१.७७ कोटी रक्कम वसूलीसाठी कलम ९८ अन्वयेचे वसूली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. सदर रकमेपैकी रु.५.७० कोटीची वसूली बँकेने केलेली आहे. तसेच उर्वरीत आर्थिक नुकसानीची रक्कम कृती आराखडा तयार करुन संबंधितांकडून सक्तीने वसूल करणेबाबत कलम ७९(१) अन्वये दिनांक २९/२/२०१६ रोजी बँकेस निदेश देण्यात आलेले होते. तथापि, शासनाकडे दाखल केलेल्या अपीलामध्ये उक्त कलम ८८ अन्वये आर्थिक

नुकसानीची जबाबदारी निश्चित केलेला चौकशी अहवाल व कलम ९८ अन्वयेची वसूली प्रमाणपत्रे शासनाकडील आदेश दि.७/७/२०१६ अन्ववे रद्द करण्यात येऊन उक्त कलम ८८ अन्वयेच्या प्रकरणी वसूलीची प्रत्यक्ष वस्तुस्थिती विचारात घेऊन सदर कर्ज पकरणाबाबत जबाबदारी निश्चित करण्याकरीता कलम ८८ अन्वये आदेश निर्गमित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार बँकेस अहवाल सादर करण्याबाबत आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या उत्पादन शुल्कात मोठ्या प्रमाणावर कपात झाली असल्याबाबत**

**(४९) ६४८४७ (२०-०८-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उत्पादन शुल्कात मोठ्या प्रमाणावर कपात झाली असल्याची बाब माहे जुलै २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, राज्याच्या उत्पादन शुल्कात झालेल्या कपातीची मुख्य कारणे काय आहेत;

(३) असल्यास, चौकशीअंती राज्याच्या उत्पादन शुल्कात वाढ होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभरण्याबाबत**

**(५०) ६५०५२ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील छत्रपती शाहू मिलच्या २७ एकर जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्य स्मारक करण्याची घोषणा शासनाने सन २०१४ मध्ये केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर स्मारक उभारण्यासाठी कोल्हापूरचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास स्मारकाच्या आराखड्यासाठी शासनाने १ कोटी रुपयांची तरतूद केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्मारक उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

वि.स. २५७ (50)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१६)** :(१) ११/१२/२०१२ रोजी नागपूर येथील बैठकीत शाहू मिलच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे

(२) होय. तसेच सदर समितीचे पुनर्गठन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय.

(४) जागा हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण होताच स्मारक उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.